# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping person in distress situation**

**Police Station** :- **Washim Police**

**Date of Good Work done** :- **18/01/2023**

**Brief of the work done :-**

पोलीस अधीक्षकांनी अपघातग्रस्तांना पोहोचविले रुग्णालयात ; वेळीच उपचार मिळाल्याने वाचला जीव.

# ‘त्या ’अपघातग्रस्तांसाठी पोलीस अधीक्षक ठरले देवदूत

## वेळीच उपचार मिळाल्याने मायलेकांचा वाचला जीव

**मालेगाव**, दि. १७ (प्रतिनिधी)

दुचाकी अपघातात गंभीर जखमी झालेल्या मायलेकांना याच रस्त्याने जात असलेल्या जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांनी स्वतःच्या गाडीत उपचारासाठी हलविले. ही घटना तालुक्यातील शिरपूर मार्गावर भेरा फाट्यानजीक १७ जानेवारी रोजी घडली असून वेळेवर उपचार मिळू शकल्याने जीव वाचल्याने पोलीस अधीक्षक साक्षात देवदूत ठरल्याची भावना अपघातग्रस्त मायलेकांनी व्यक्त केली.

अधिक माहितीनुसार, अकोला येथील सुनीता मोतीराम गायकवाड (५०) व मुलगा अक्षय गायकवाड(३०) हे दोघे एम. एच. ३० बि-२४१३ या क्रमांकाच्या दुचाकीने जात असताना मालेगाव ते शिरपूर मार्गावरील भेरा गावाजवळ रस्त्यात रोही आल्याने दुचाकीचा अपघात झाला.

या अपघातात दोघे मायलेक गंभीर जखमी होवून रस्त्याच्या कडेला पडले. सुदैवाने यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक हे पोलीस ताफ्यासह मालेगावकडे येत असताना त्यांना अपघात दिसला. क्षणाचाही विलंब न करता त्यांनी जखमींना स्वतःच्या वाहनातून मालेगाव येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी हलविले.

वेळेवर उपचार मिळू शकल्याने मायलेकाला नवजीवन मिळाल्याची भावना जखमी सुनीता गायकवाड यांनी व्यक्त करत पोलीस अधीक्षकांचे आभार व्यक्त केले.